**<u>नि. फौ. खटला क्र.११६/२०२२</u>**

**<u>निशाणी क्र.८५</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : कोंडीबा गोविंद कांबळे,

**<u>वय</u>** : २६ वर्षे, **<u>धंदा</u>** : मजुरी,

**<u>राहणार</u>** : येणकी, ता. उदगीर, जि. लातूर.

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

मी सर्व आरोपींना ओळखतो. आजरोजी पुजा कांबळे, दिक्षा कांबळे व संगिता कांबळे हे गैरहजर आहेत आणि ईतर आरोपी हजर आहेत. (अर्ज निशाणी ७४ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.७ ते ९ यांची गैरहजेरी माफ केलेली आहे.) दि.२९/०५/२०२२ रोजी रात्री १२.३० वाजता माझ्या घरासमोर घटना घडली. मी झोपलेलो असताना माझ्या घराच्या पत्र्यावरती धोंडे टाकले होते. त्यावेळी मी घराबाहेर गेलो. माझ्यासोबत माझी आई राजाबाई होती. त्यानंतर माझा भाऊ सुकुमार तेथे आला होता. आरोपी गौतमने काठीने सुकुमारला मारले. नंतर आरोपी विजयकुमार तेथे आले. त्यांनी राजाबाईच्या गुडघ्यावर काठीने मारले. आरोपी गौतमने माझ्या आईचे झंपर फाडले होते आणि गळ्यातील पाच ग्रामचे मंगळसूत्र तोडले होते. सर्व नऊ आरोपी माझ्या घरात शिरले होते. त्यानंतर माझ्या घरातून ₹३०,०००/– गेले होते.

सरतपास पूर्ण.

**<u>:: आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. बी.डी. पाटील यांच्यामार्फत ::</u>**

०२. माझे शिक्षण ७ वी पर्यंत झाले. माझ्या घराचा मिळकत क्रमांक सांगता येत नाही. माझ्या घराची लांबी रुंदी मला माहीत नाही. माझ्या घराच्या सूर्य उगवते दिशेला केरबा बिरादार यांचे घर आहे, सूर्य मावळत्या दिशेला गुंडू शिंदेचे घर आहे, राकसाकडे – समाजमंदिर आणि विरुध्द दिशेला रस्ता आहे. गोविंद बापूराव कांबळे हे माझे वडील आहेत. माझ्या वडिलांना एक बहीण शेषाबाई मारुती कदम आहे, परंतु भाऊ नाही. गोविंदच्या चुलत्यांबाबत मला माहीत नाही. माणिकप्रभू भुताळे हे माझे नातेवाईक नाहीत.

नारायण पुंडा शिंदे हे माझे नातेवाईक आहेत. माझ्या जमिनीचा गट क्रमांक मला माहीत नाही. मी जमिनीचा गट क्र.७९/२ असल्याचे कोणालाही सांगितले नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, कमळाबाई मारुती कांबळे यांनी माझ्या वडिलांविरुद्ध उदगीर न्यायालयामध्ये शेताबाबत दावा दाखल केलेला आहे व तो चालू आहे. सर्वे क्र.७९/२ ही जमीन गायरान आहे. ती माझ्या वडिलांना कशी मिळाली हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९/०५/२०२२ रोजी रात्री माझ्या घरासमोर घटना घडल्याचे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईला आरोपींनी मारहाण केल्याचे, झंपर फाडल्याचे खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि ईतरांनी आरोपी दयानंदला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे आहे की, दयानंदने आमच्याविरुध्द मारहाणीबाबत पोलिसांत तक्रार केली होती व त्याबाबत प्रकरण प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरण आणि दिवाणी दावा काढून घेण्यासाठी आम्ही खोटी केस केली आणि खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.०४/०२/२०२६.